MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ०४–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. संजय शहाजी शिंदे,<br>रा. बसाप्पावाडी, ता. कवठे महांकाळ, जि. सांगली | अर्जदार |

**विरूध्द**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. बी. ए. जाधव, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

## महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग

(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. संजय शहाजी शिंदे, रा. बसाप्पावाडी, ता. कवठे महांकाळ, जि. सांगली यांनी वितरण कंपनीकडे आपल्या शेतीपंपासाठी नवीन विद्युत पुरवठा मिळावा म्हणून दि. १६.६.२००९ रोजी केला व प्रोसेसिंग फी रु. ५०/– भरली.

त्यांना कृती मानकातील तरतुदीनुसार ३० दिवसांचे मुदतीत दि. १५.७.२००९ पर्यंत चलन देणे आवश्यक होते, परंतु ते आजतागायत दिले नाही. तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. १.१.२०१० रोजी तक्रार दाखल केली त्याचे आदेश दि. ४.१.२०१० रोजी पारित झाले आहेत. या मंचाकडे दि. ८.१.२०१० रोजी अर्ज दाखल करुन कृती मानकातील तरतुदीनुसार चलन देण्यास झालेल्या विलंबापोटी प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे नुसार भरपाई मिळावी अशी विनंती केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. २४.२.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदाराची तक्रार दि. २२.६.२००९ रोजी मिळाल्याचे व त्यांस दि. २०.१.२०१० रोजी चलन दिल्याचे म्हटले आहे.

सदरच्या तक्रारीची सुनावणी दि. १०.३.२०१० रोजी ठेवण्यात आली होती, परंतु सर्वांचे संमत्तीने ती दि. ९.३.२०१० रोजी घेण्यात आली. वितरण कंपनीतर्फे श्री. राखे, सहाय्यक अभियंता, श्री. अे.के. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता हजर. तक्रारदार प्रतिनिधी श्री. खापरे हजर. श्री. राखे, सहा.अभियंता यांनी तक्रारदाराचा दि. १६.६.२००९ चा अर्ज हरवला असल्यामुळे ग्राहकाकडून दि. ७.१.२०१० ला नवीन अर्ज घेतला व दि. २०.१.२०१० रोजी चलन देण्यात आले. टेस्ट रिपोर्ट मिळाल्यानंतर कनेक्शन चालू करुन देवू असे प्रतिपादन केले आहे.

ग्राहकातर्फे प्रतिनिधीनी अधिकारपत्र सादर केले. ग्राहकाने चलन भरुन व टेस्ट रिपोर्ट दिल्यानंतर कनेक्शन देण्यात येईल अशी हमी श्री. राखे, सहाय्यक अभियंता यांनी अधिकारपत्रावर लेखी दिली आहे व ग्राहक प्रतिनिधींनी तक्रार मागे घेत असल्याचे अधिकारपत्रावर लेखी व तोंडी मंचासमोर दि. ९.३.२०१० रोजी सांगितले.

प्रोसेसिंग फी रु.५०/– भरल्याची पावती दि.१६.६.२००९ ची आहे. अर्ज हरवल्यामुळे वि.प.ने ग्राहकाकडून नवीन अर्ज दि. ७.१.२०१० ला घेवून अंतर्गत कक्षाच्या दि. ४.१०.२०१० च्या आदेशानुसार दि. २०.१.२०१० ला चलन दिले आहे. एक गोष्ट निश्चित की, वि.प.ने आपल्या कर्तव्यात कसूर केली असून कृती मानकातील तरतुदीनुसार चलन देण्यास विलंब केला आहे. अर्जानुसार चलन दि. १५.७.२००९ पर्यंत देणे आवश्यक होते. १५.७.२००९ ते दि. २०.१.२०१० या कालावधीच्या विलंबापोटी तक्रारदार यांस कृती मानकानुसार प्रति आठवडा रु. १००/– नुकसान भरपाई मिळण्याचा हक्क प्राप्त झाला आहे व ती देण्याची वि.प.ची जबाबदारी आहे. परंतु तक्रारदार यांनी आपली तक्रार मागे घेतली आहे. कदाचित वि.प.ने त्वरित कनेक्शन देण्याचे लेखी/ तोंडी आश्वासन दिल्यामुळे तक्रार मागे घेण्याचा निर्णय घेतल्याचे दिसते. परंतु चलन भरुन टेस्ट रिपोर्ट देणे ही ग्राहकाची जबाबदारी आहे. खालील प्रमाणे आदेश –

ग्राहक तक्रार निवारण मंचाचे अध्यक्षांचे पद दिनांक ३.९.२००९ ते २०.१०.२००९ व सदस्य यांचे पद दि. १.९.२००९ पासून दि. २.११.२००९ पर्यंत रिक्त राहिल्याने ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम २००५, क्र. ५:१ चे तरतुदीनुसार सदर अपिलावर असलेल्या दोन महिन्यांचे मुदतीचे मर्यादेनंतर निकाल देणेत येत आहे.

## आदेश

१) तक्रारदाराने मंचासमोर दि. ९.३.२०१० रोजी तक्रार मागे घेतल्याने निकाली काढण्यात येत आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाही.

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )

अध्यक्ष

श्री. बी. ए. जाधव, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :